**गैरअर्जदारांतर्फे उलटतपास–श्री. एन. जी. पोवार वकील यांच्यामार्फत–**

**१६.** आमचे लग्न मध्यस्थां मार्फत ठरवून झाले होते. आम्ही एकमेकांना पसंत केल्यानंतर गैरअर्जदाराच्या घरी यादी करण्यासाठी गेलो होतो. तेथे साखरपुडा व विवाह कशा पध्दतीने करायचा याबाबत चर्चा झाल्यानंतर यादी तयार करण्यात आली होती. त्याप्रमाणे साखरपुडा आमच्याकडे आजरा येथे करण्याचे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कारण काढून गैरअर्जदारांना साखरपुडा करायला लावले होते.

**१७.** आमचे लग्न ठरल्यानंतर मी व गैरअर्जदार क्र. १ फोनवरती बोलत होतो. आमची पसंती झाल्यापासून लग्न होईपर्यंत दोन महिन्यांचा कालावधी गेला होता. आमच्या लग्नाच्या याद्या करताना माझे नातेवाईक तेथे हजर होते. आमच्या लग्नाच्या याद्या दोन्ही कुटुंबांच्या संमतीने झालेल्या आहेत. त्या याद्यांप्रमाणे ज्याने–त्याने त्याच्या पाहुण्यांचा खर्च करायचे ठरले होते. त्या याद्याप्रमाणे लग्नाचा संपुर्ण खर्च गैरअर्जदारांनी करायचे ठरले होते. मला गैरअर्जदारांनी लग्नाचा संपुर्ण खर्च केल्याची माहिती नाही.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही लग्नासाठी कोणताही खर्च केलेला नाही. मी लग्नात आम्ही केलेल्या खर्चांची कागदपत्रे माझ्या पुराव्यासोबत दाखल केलेली नाहीत. मी लग्नानंतर गैरअर्जदारांच्या अंबाई टँक येथील घरी राहण्यास गेले नव्हते. मी लग्नानंतर गैरअर्जदार क्र. १ च्या कायझेल पार्क येथील घरात राहण्यास गेले होते. तेथे मी गैरअर्जदार क्र. २ व गैरअर्जदार क्र. १ ची मामे बहिण गैरअर्जदार क्र. ३ सोबत राहत होते. गैरअर्जदार क्र. २ ला गुडघ्याचा आजार असल्यामुळे जास्त चालता–फिरता येत नसल्यामुळे जास्त वेळ झोपून असतात.

**१९.** गैरअर्जदार क्र. ३ ही महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. मी गैरअर्जदारांनी दिलेल्या त्रासाबाबत माझ्या माहेरी सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांनी कधीही मला त्रास दिलेला नसल्यामुळे मी त्याबाबत माझ्या माहेरी सांगितले नव्हते. मी माझ्या आई–वडिलांना गैरअर्जदार क्र. १ ने बंद खोलीत मारहाण केल्याबाबत सांगितले होते. मी त्याबाबत गैरअर्जदार क्र. १ च्या विरोधात कोठेही पोलिस तक्रार केलेली नाही. हे म्हणणे

खरे नाही की, मला कोणतीही मारहाण झालेली नसल्यामुळे मी त्याबाबत तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जातील परिच्छेद क्र. ४ मध्ये खोटा मजकूर लिहिला आहे.

**२०**. माझी आई आज–यातील प्रतिष्ठीत महिला असून कोल्हापूर जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीची अध्यक्ष आहे. माझ्या आईचा राजकीय व सामाजिक क्षेत्रातील लोकांशी कायम संपर्क येतो. माझे आई–वडिल समाजातील दुर्बल घटकांवरती अन्याय झाल्यास त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम करतात.

**२१**. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ ची संपुर्ण चौकशी केल्यानंतर लग्नाला संमती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्ज व माझ्या पुराव्यात गैरअर्जदार क्र. १ ने त्याचे सहा हॉटेल व पाच गुंठयाचा प्लॉट असल्याबाबत खोटे सांगितले असे चुकीचे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ सैन्यदलात नोकरी करत असून इतर लोकांकडून नोकरी लावण्यासाठी पैसे घेत असल्याचे खोटे नमूद केले आहे. माझ्याकडे गैरअर्जदार क्र. १ पैसे घेत असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. मी गैरअर्जदार क्र. १ च्या विरोधात लोकांनी तक्रार केल्याबाबतचा पुरावा दाखल केलेला नाही.

**२२**. मला गैरअर्जदार क्र. १ ने गाडीत बसवून नदीमध्ये बुडवण्याची धमकी दिल्याची घटना कोणत्या तारखेला घडली याबाबत सांगता येणार नाही. मी सदर घटने बाबत माझ्या माहेरी सांगितले होते. मी अथवा माझ्या माहेरच्यांनी त्याबाबत पोलिसांकडे तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदार क्र. १ ने कोणतीही धमकी दिलेली नसल्यामुळे आम्ही त्याबाबत तक्रार दिलेली नाही.

**२३**. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये गैरअर्जदार क्र. ३ सॅनिटरी पॅड बेडवरती टाकत असल्याबाबत खोटा मजकूर नमूद केला आहे. मी त्याबाबत माझ्या माहेरी सांगितले होते. मी गैरअर्जदार क्र. १ व ३ एकमेकांना घास भरवून जेवण करत असल्याचे तसेच गैरअर्जदार क्र. १ ने मला गैरअर्जदार क्र. ३ ला काही बोलल्यास खपवून घेणार नसल्याचे व माझ्याशी लग्न करुन चूक केली आहे असे म्हणाल्याची बाब माझ्या माहेरी

सांगितली होती. माझ्या घरच्यांनी त्याबाबत कोठेही तक्रार केली नव्हती. त्यांनी बैठक घेऊन गैरअर्जदार क्र. १ ला समज दिली होती. मी माझ्या अर्जात व शपथपत्रात सदर घटने बाबत बैठक घेतल्याबाबत विशेषपणे नमूद केलेले नाही. आम्ही घेतलेल्या बैठकीमध्ये सर्व बाबींबाबत चर्चा झाल्यामुळे त्याबाबतचा विशेष उल्लेख केलेला नाही.

**२४**. मला आमच्यामध्ये कोणत्या तारखेला बैठक झाली याबाबत सांगता येणार नाही. साक्षीदार सांगते, घटनेनंतर आठ दिवसांनी बैठक घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही बैठक झालेली नव्हती. मला गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी माझ्याशी जम्मू–काश्मीरला जाण्यासाठी केव्हा भांडण केले याची तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी कोणतेही भांडण केलेले नसल्यामुळे मला त्याची तारीख सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जम्मू–काश्मीरला फिरायला गेल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ने मारहाण करुन धमकी दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

**२५**. गैरअर्जदार क्र. ३ ही तिच्या लहानपणापासून गैरअर्जदारां सोबत राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ व ३ यांच्या वयामध्ये साधारणतः १३ ते १४ वर्षांचे अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. ३ माझ्या सांगण्यावरुन मैत्रीणी सोबत भाडयाच्या घरात राहत होती. मला गैरअर्जदार क्र. १ राजकीय पदावरती असल्याचे माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ९ मध्ये खोटा व चुकीचा मजकूर नमूद केला आहे.

**२६**. हे म्हणणे खरे नाही की, लग्नामध्ये गैरअर्जदारांनी मला १० तोळे सोन्याचे दागिने घातले आहेत. मी व गैरअर्जदार क्र. १ लग्नानंतर तिरुपती व म्हैसूर बँगलोर येथे फिरायला गेलो होतो. त्या काळी गैरअर्जदारांच्या घरी काम करण्यास बाई येत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी लग्नानंतर नेहमी आईशी फोनवरती बोलत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला समाजमाध्यमाचा वापर करण्याची सवय आहे.

**२७**. मी नोव्हेंबर २०२१ मध्ये माझ्या मामे बहिणीच्या लग्नासाठी माहेरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या लगनानंतर गैरअर्जदारांना कोणतीही माहिती न देता मामे

बहिणीसोबत पूजेकरीता मुंबईला निघून गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दरम्यान गैरअर्जदार क्र. १ चा मोबाईल क्रमांक ब्लॉक केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदारांनी मध्यस्था मार्फत कधी येणार याबाबत विचारले असता मी येण्यास नकार दिला होता. मी त्यानंतर गैरअर्जदारांच्या विनंती वरुन एक महिन्यानंतर सासरी गेले होते.

**२८.** हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी आईच्या सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र. १ व २ यांना उलट–सुलट उत्तरे देत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यानंतर उशिरापर्यंत झोपून राहून घरकामात लक्ष देत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दरम्यान पत्नी व सून म्हणून कोणतेही कर्तव्य पार पाडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ कडे गैरअर्जदार क्र. २ पासून वेगळे राहण्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यास गैरअर्जदार क्र. १ ने नकार दिल्यामुळे मी भांडणे करत होते.

**२९.** ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२१ दरम्यान गैरअर्जदार क्र. २ चे डोळयाचे ऑपरेशन झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी माझ्या आईच्या सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र. २ सोबत भांडणे करत होते. मी दि. १४.१२.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ सोबत फिरण्यासाठी पंजाब व पाकिस्तान येथे गेले होते. मी तेथून आल्यानंतर माझ्या माहेरी वाटण्या होणार असल्याचे सांगून दि. १६.०१.२०२३ रोजी माहेरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदारांनी त्यावेळी जाण्यास परवानगी दिली होती. मी त्यानंतर परत गैरअर्जदारांकडे नांदण्यास गेलेली नाही.

**३०.** हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी येताना गैरअर्जदारांचे रेशनकार्ड, माझा पासपोर्ट, पॅनकार्ड, आधारकार्ड आणि दागिने घेऊन निघून आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर गैरअर्जदारांनी परत नांदावयास येण्याची विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी येत नसल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ने माझ्या मामाची भेट घेतली होती. मी मामाच्या सांगण्यावरुन दि. २३.०२.२०२३ रोजी नांदायला जाण्यास तयार झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी मला गैरअर्जदार क्र. १ हलकर्णी येथे नेण्यास येणार होता. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ सोबत येण्यास नकार दिला होता.

**३१**. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदारांनी लग्नातील मध्यस्थी जागृती माईन यांच्या मार्फत नांदायला येण्याबाबत निरोप दिला होता. मी नांदायला गेलेली नसल्यामुळे गैरअर्जदारांनी मला वकिलां मार्फत नोटीस पाठवली होती. मी त्या नोटीसीला उत्तर दिलेले नसून नांदायला देखील गेले नाही. मी नांदायला येण्याबाबत गैरअर्जदार क्र. १ ने जिल्हा विधी सेवा, कोल्हापूर यांच्याकडे अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या प्रकरणासाठी हजर राहिले नव्हते.

**३२**. मी नांदायला गेलेली नसल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ने महिला कक्षाकडे तक्रारअर्ज केल्याची माहिती नाही. साक्षीदार पुन्हा सांगते, गैरअर्जदार क्र. १ ने अर्ज केला होता. त्या अर्जामध्ये माझा व गैरअर्जदार क्र. १ चा जबाब घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ ने तेथे मला नांदवायची संपुर्ण तयारी दाखवली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे पोलिसांसमोर नांदायला जायची ईच्छा नसल्याचे सांगितले होते. मी गैरअर्जदार क्र. १ ने नांदण्यास येण्याबाबत बरेच प्रयत्न करुन देखील नांदायला गेलेले नाही.

**३३**. गैरअर्जदार क्र. १ ने मी नांदायला येण्याबाबत कोल्हापूर न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. मी त्याची नोटीस मिळाल्यानंतर हा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दाव्याची नोटीस मिळेपर्यंत गैरअर्जदारां विरोधात कोठेही तक्रार दाखल केलेली नाही. मी त्यापुर्वी दिलेल्या तक्रारीची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. मी त्याबाबतची कागदपत्रे दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, मला नांदवायच्या दाव्याची नोटीस येईपर्यंत मी गैरअर्जदारां विरोधात कोठेही तक्रार दाखल केलेली नाही.

**३४**. मी गैरअर्जदार क्र. १ चे निपाणी व कोल्हापूर येथील हॉटेलची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. मी ती कागदपत्रे दाखल करु शकते किंवा नाही याबाबत सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ चे कोणतेही हॉटेल नसल्यामुळे त्याबाबतची कागदपत्रे दाखल करु शकत नाही. मी गैरअर्जदार क्र. १ ला हॉटेलपासून मिळणा–या उत्पन्ना बाबतची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

**३५**. माझे पदवी पर्यंतचे शिक्षण झालेले असून मला कोणतेही शारिरीक व्यंग नाही. हे

म्हणणे खरे नाही की, मी लग्नापूर्वी साई सर्वीस आजरा येथे नोकरी करत होते. मी सध्या मंगळसूत्र घालत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ ला पती मानत नसल्यामुळे मंगळसूत्र घातलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गैरअर्जदार क्र. १ सोबत संसार करण्यात कोणतेही स्वारस्य राहिलेले नाही. मला गैरअर्जदाराने शारिरीक व मानसिक त्रास दिलेला असल्यामुळे नांदायला जायचे नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांनी माझा कधीही शारिरीक व मानसिक छळ केलेला नाही.

**३६**. मला मोठा भाऊ असून त्याचे वय ३७ वर्ष आहे व तो अद्याप अविवाहित आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या आईच्या सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र. १ सोबत संसार करण्यास नकार दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदारांच्या विरोधात पुरावा तयार करण्यासाठी सदर अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक - १५.१०.२०२४.

(आर. पी. थोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.